**प्रेस नोट दिनांक २९/०७/२०१९**
**खडक पोलीस ठाणे, पुणे शहर**
**रिक्षा मधील राहिलेले मौल्यवान वस्तु महिलेस परत ताब्यात दिलेबाबत.**

दि.२३.०७.२०१९ रोजी खडक पोलीस ठाणे अंकित मिठगंज पोलीस चौकी येथे प्रभारी अधिकारी पोउपनि मिसाळ, चौकी अंमलदार पोना ८९३ शेंडगे असे दिवसपाळी कर्तव्यावर हजर असताना, १६.०० वाजण्याचे सुमारास महिला नामे अभिसारीका शामराव केकाणे रा. बिबवेवाडी पुणे व पल्लवी राजेश ढगे रा. गवरी आळी गुरूवार पेठ पुणे यांनी चौकीमध्ये येऊन सांगितले की, त्यांची हॅन्डबॅग रिक्षामध्ये राहली असून त्यामध्ये रोख रक्कम १०,०००/- रूपये व मौल्यवान दागिने, कपडे असा ऐकुण ३५०००/- रूपयांचा ऐवज असल्याचे सांगितले.

सदरवेळी चौकी अधिकारी पोउपनि मिसाळ यांनी मिठगंज बीट मार्शलवरील कर्मचारी पो.शि. ८८०३ भोसले व पोशि ९८९६ चंदनशिव, चौकी दप्तरी पो.शि. ८३४४ खरात यांना सदर प्रकार सांगुन रिक्षाचे वर्णन सांगुन रिक्षाचा चौकी हद्दीमध्ये शोध घेण्यास सांगितले. नमुद कर्मचारी यांनी सदर रुटवरील सीसीटीव्ही फुटेज पाहणी करून रिक्षाचा शोध घेऊन, रिक्षामध्ये विसरुन राहीलेले तक्रारदार यांची हॅन्डबॅग मिळुन आल्याने त्यामधील सर्व सामानाची खात्री करून सदरची हॅन्डबॅग तक्रारदार यांना परत केली आहे. तक्रारदार यांनी पोलीसांनी तात्काळ मदत केल्याने आभार मानले.

**( भरत जाधव )**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
खडक पोलीस ठाणे, पुणे शहर.

